क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.४५७
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - २७/०८/२०१९

प्रति,

१. उप नियंत्रक शिधावाटप,
अ,ड, ई, ग व फ परिमंडळ
२. उप संचालक (गो/वा),
सं.ना.पु. परेल.

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन (सुधारीत) माहे सप्टेंबर, २०१९**

**संदर्भ :-** १.शासनपत्र क्र. अधापु-२०१९/प्र.क्र.८/ना.पु.-२२, दि. २० जून, २०१९
२. क्र.निशि/मागणी/२०१९/जा.३२९, दि. २६.०६.२०१९
३. क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.३९४, दि. ३१.०७.२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे सप्टेंबर, २०१९ करीता परिमंडळनिहाय नियतन मंजूर करण्यात आले आहे.

ज्या कार्डधारकास e-PoS द्वारे जून, २०१९ मध्ये धान्य वितरीत करण्यात आले आहे त्यांना गरजेनुसार १००% नियतन व e-PoS मशिनचा वापर न करता किंवा रुट नॉमिनीचा वापर न करता जून, २०१९ मध्ये मॅन्युअली धान्य वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यास गरजेनुसार १००% नियतन व माहे जून, २०१९ अखेर शिल्लक साठा विचारात घेऊन सदरचे सप्टेंबर, २०१९ करिता नियतन मंजूर करण्यात आले आहे. संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये माहे जुलै, २०१९ च्या वितरणासाठी धान्य कमी पडल्यास माहे ऑगस्ट, २०१९ च्या नियतनानुसार प्राप्त धान्यामधून विक्री करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने ड, ई, ग, व फ परिमंडळ कार्यालयांकडून माहे ऑगस्ट, २०१९ च्या नियतनामधून माहे जुलै, २०१९ मध्ये विक्री केलेल्या साठ्याची दुकाननिहाय माहिती प्राप्त झाली आहे. फ परिमंडळ कार्यालयाकडून अतिवृष्टीमुळे धान्य खराब झाल्याने सदर दुकानांमधून वाटपासाठी धान्य कमी पडणार असल्याने वाढीव नियतन मिळणेबाबत व ४१ फ भाईंदर कार्यालयाकडून ४१ फ २६६ दुकानाची प्राधान्य कुटुंब योजनेच्या धान्याची माहे जून, २०१९ ची विक्री चुकीची कळविण्यात आल्याने सुधारीत माहितीनुसार नियतन मंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

तसेच, हमीपत्र भरुन घेतल्यानुसार वाढीव लाभार्थ्यांसाठी धान्याचा कोटा वाढवून मिळण्याबाबतचे प्रस्ताव परिमंडळ कार्यालयांकडून प्राप्त झाले आहेत. माहे जुलै व ऑगस्ट, २०१९ मध्ये पंडित दिनदयाल अभियाना अंतर्गत लाभार्थ्यांमध्ये झालेली वाढ, तसेच पुरग्रस्तांनाही धान्याचे वाटप करावयाचे असल्याने, वर

परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद प्रस्तावांव्यतिरिक्त, अ.शि. दुकानांना माहे सप्टेंबर, २०१९ च्या नियतनामध्ये सरसकट १०% नियतन वाढवून देण्यात येत आहे. सदरचे वाढीव नियतन उप नियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालय यांनी त्यांचे स्तरावर अधिकृत शिधावाटप दुकानांच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन घ्यावे. तसेच, उर्वरीत धान्य साठा अ.शि. दुकानात शिल्लक ठेवण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे पात्र लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून माहे सप्टेंबर, २०१९ करिता खालीलप्रमाणे सुधारीत नियतन मंजूर करण्यात येत आहे.

**<u>माहे सप्टेंबर, २०१९ करीता प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सुधारीत मंजूर नियतन</u>**

(आकडे मे. टन मध्ये)

| अ. क्र. | परि मंडळ | दिनांक ३१.०७.२०१९ च्या पत्रान्वये मंजूर नियतन | | नियतनात वाढ | | माहे सप्टेंबर, २०१९ करिता सुधारीत मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| १ | अ | ९१५.७४० | १३५४.४४३ | १०३.०३८ | १५३.७२४ | १०१८.७७८ | १५०८.१६७ |
| २ | ड | १२८७.३४६ | १९४३.८३६ | १६५.४३६ | २५२.६१८ | १४५२.७८२ | २१९६.४५४ |
| ३ | ई | २९६६.९४७ | ४५८८.३४२ | ३५२.७४९ | ७१३.२६३ | ३३१९.६९६ | ५३०१.६०५ |
| ४ | ग | १५८३.२१४ | २३७४.८८३ | २०५.४९२ | ३११.५०६ | १७८८.७०६ | २६८६.३८९ |
| ५ | फ | ४२०६.५२५ | ६३१३.१२३ | ५२४.८४५ | ७७३.७९० | ४७३१.३७० | ७०८६.९१३ |
| एकूण | | १०९५९.७७२ | १६५७४.६२७ | १३५१.५६० | २२०४.९०१ | १२३११.३३२ | १८७७९.५२८ |

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या वाढीव नियतनानुसार तात्काळ वितरण आदेश निर्गमित करुन अन्नधान्याची संपूर्ण उचल करण्यात यावी. तसेच, वाढीव नियतनाचे वाटप पात्र लाभार्थ्यांना होईल याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना कायम रहातील. सदर वाटप e-POS मशिनद्वारे ऑनलाईन पध्दतीने १००% करणे बंधनकारक राहिल.

(कैलास पगारे) भा.प्र.से.
**नियंत्रक शिधावाटप व**
**संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई.**

प्रत :

१. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २२, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय, जी. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई.